# प्रेसनोट

तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील तलाठी यांनी लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग मार्फत कारवाई केलेबाबत

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | सिंधुदुर्ग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १०२/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७, ७ अ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. बाळासो शामराव शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, वर्ग–३ |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |

**थोडक्यात हकीगत:-**

यातील तक्रारदार यांनी तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे सुमारे ५ गुंठे जमीन दिनांक ०७/०१/२०२२ रोजी कायदेशीर खरेदी खताने खरेदी केली. खरेदीखताप्रमाणे ७/१२ च्या अभिलेखात नोंद होणेकरीता खरेदी खताची प्रत तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ येथे दिनांक ०७/०१/२०२२ रोजी दिली. दिनांक १२/०५/२०२२ रोजी तक्रारदार यांनी तलाठी कार्यालय तुळसली तर्फ माणगाव येथे जावुन तलाठी श्री. शिंदे यांची भेट घेवुन ७/१२ संदर्भात विचारपूस केली असता, त्यांनी ७/१२ तयार झाला नसल्याचे सांगुन तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपयांची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. शिंदे यांची अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक १२/०५/२०२२ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १२/०५/२०२२ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांनी तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीची सातबारा चे अभिलेखात नोंद करून सातबारा देणेकरीता तक्रारदार यांचेकडे स्वत:करीता १०००/- व मंडळ अधिकारी पास्ते यांचेकरीता २०००/- अशी एकुण ३०००/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे. म्हणून दिनांक ०१/०६/२०२२ रोजी लाकसेवक श्री. बाळासो शामराव शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, वर्ग-३, यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये कुडाळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. सदर गुन्हयातील आरोपी लोकसेवक शिंदे हे सध्या नजरेआड असुन त्यांचा शोध चालु आहे.

वरील कारवाई श्रीम. आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदूर्ग यांचेकडून करण्यात आलेली आहे.

**मार्गदर्शन अधिकारी–मा. डॉ. पंजाबराव उगले सो, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र ठाणे.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग यांचेशी संपर्क करावा.**

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग, कार्यालय कुडाळ
तहसीलदार कार्यालय कुडाळ समोर, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, ४१६५२०

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dyspacbsindhudurga@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net
टोल फ्री नंबर :– १०६४
दुरध्वनी क्र. :– ०२३६२–२२२२८९

(आसमा मुल्ला)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग